# (२१) राज्यशास्त्र आणि आंतरराष्ट्रीय संबंध (माध्यम-मराठी व इंग्रजी)

<table>
<tr><th colspan="2">पेपर — एक (विषय सांकेतांक १०४९)</th></tr>
<tr><td>१</td><td><u>राजकीय सिद्धान्त आणि भारतीय राजकारण</u> :<br>१. राजकीय सिद्धान्त: अर्थ आणि दृष्टिकोन.<br>२. राज्याचे सिद्धान्त: उदारमतवादी, नव-उदारमतवादी, मार्क्सवादी, बहुत्ववादी, उत्तर वासाहतिक आणि स्त्रीवादी.<br>३. न्याय: रॉल्सचा न्यायाचा सिद्धान्त आणि त्याच्या समूहलक्षी टिका यांच्या विशेष संदर्भासह न्यायाच्या संकल्पना.<br>४. समानता: सामाजिक, राजकीय व आर्थिक; समानता आणि स्वातंत्र्य यांमधील संबंध; सकारात्मक कार्यवाही.<br>५. हक्क: अर्थ व सिद्धान्त; हक्कांचे निरनिराळे प्रकार; मानवी हक्कांची संकल्पना.<br>६. लोकशाही: अभिजात व आधुनिक सिद्धान्त; लोकशाही निरनिराळे प्रतिमान — प्रातिनिधीक, सहभागी आणि विमर्शकारी.<br>७. अधिकार संकल्पना; वैचारिक धुरिणत्व, विचारप्रणाली आणि अधिमान्यता<br>८. राजकीय विचारप्रणाली: उदारमतवाद, समाजवाद, मार्क्सवाद, फॅसीझम, गांधीवाद आणि स्त्रीवाद.<br>९. भारतीय राजकीय विचारधारा: धर्मशास्त्र, अर्थशास्त्र आणि बौद्ध परंपरा; सर सय्यद अहमद खान, श्री. अरबिंदो, एम. के. गांधी, बी.आर. आंबेडकर, एम.एन.रॉय.<br>१०. पाश्चिमात्य राजकीय विचारधारा : प्लेटो, ॲरिस्टॉटल, मॅकियावेली, होब्स, लॉक, जॉन एस मिल, मार्क्स, ग्रॅामसी, हन्नाह ॲरेन्ड.</td></tr>
<tr><td>२</td><td><u>भारतीय सरकार आणि भारतीय राजकारण</u><br>१. भारतीय राष्ट्रवाद :<br>(अ) भारताच्या स्वातंत्र्य लढ्याची राजकीय व्युहरचना: घटनावाद ते लोकसत्याग्रह, असहकार, नागरी कायदेभंग; लढाऊ आणि क्रांतिकारी चळवळी; शेतकरी व कामगार चळवळी.<br>(ब) भारतीय राष्ट्रीय चळवळीवरील दृष्टिकोन; उदारमतवादी, समाजवादी आणि मार्क्सवादी; मुलगामी मानवतावादी आणि दलित.<br>२. भारताच्या संविधानाची निर्मिती: ब्रिटिश शासनाचा वारसा, विभिन्न सामाजिक व राजकीय दृष्टिकोन.<br>३. भारतीय संविधानाची ठळक वैशिष्ट्ये: उद्देशिका, मूलभूत हक्क व कर्तव्ये, निदेशक तत्वे, संसदीय प्रणाली व सुधारणा कार्यपद्धती: न्यायिक पुर्नविलोकन आणि मूळ संरचना सिद्धान्त.<br>४. (अ) संघ सरकारची प्रमुख अंगे: कार्यकारी, विधिमंडळ आणि सर्वोच्च न्यायालयाची परिकल्पित भूमिका आणि प्रत्यक्ष कामकाज.<br>(ब) राज्य शासनाची प्रमुख अंगे: कार्यकारी, विधिमंडळ आणि उच्च न्यायालयाची परिकल्पित भूमिका आणि प्रत्यक्ष कामकाज.<br>५. तळागाळातील लोकशाही: पंचायती राज आणि नगरपालिका शासन; ७३ व्या आणि ७४ व्या सुधारणांचे महत्त्व; तळागाळातील चळवळी.<br>६. सांविधानिक संस्था/आयोग: निवडणूक आयोग, महानियंत्रक व लेखापरीक्षक, वित्त आयोग, संघ लोकसेवा आयोग, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग, राष्ट्रीय अनुसूचित जनजाती आयोग, राष्ट्रीय महिला आयोग; राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोग, राष्ट्रीय मागासवर्ग आयोग.<br>७. संघराज्यवाद: सांविधानिक तरतुदी; केंद्र-राज्य संबंधांचे बदलते स्वरूप, एकात्मवादी प्रवृत्ती आणि प्रादेशिक आकांक्षा, आंतर-राज्य विवाद.<br>८. नियोजन व आर्थिक विकास : नेहरूवादी व गांधीवादी दृष्टिकोन; नियोजन व सार्वजनिक क्षेत्राची भूमिका; हरित क्रांती; जमीन सुधारणा; कृषक संबंध; उदारीकरण आणि आर्थिक सुधारणा;<br>९. भारतीय राजकारणातील जात, धर्म आणि वांशिकता.<br>१०. पक्ष प्रणाली: राष्ट्रीय व प्रादेशिक राजकीय पक्ष, पक्षांची विचारप्रणाली आणि सामाजिक पाया, आघाड्यांच्या राजकारणाचे आकृतीबंध; दबाव गट, निर्वाचक वर्तनाच्या प्रवृत्ती; विधिकारांच्या सामाजिक - आर्थिक रुपरेखेतील बदल.<br>११. सामाजिक चळवळ: नागरी स्वातंत्र्य आणि मानवी हक्क चळवळी, महिलांच्या चळवळी आणि पर्यावरणवादी चळवळी.</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| | **पेपर - दोन (विषय सांकेतांक १०५०)**<br>**<u>तुलनात्मक राज्यशास्त्र आणि आंतरराष्ट्रीय संबंध</u>** |
| १ | **तुलनात्मक राजकीय विश्लेषण आणि आंतरराष्ट्रीय राज्यशास्त्र.**<br>१. तुलनात्मक राज्यशास्त्र: स्वरुप आणि मुख्य दृष्टिकोन; राजकीय अर्थशास्त्र आणि राजकीय समाजशास्त्र परिप्रेक्ष्य; तुलनात्मक पद्धतीच्या मर्यादा.<br>२. तुलनात्मक परिप्रेक्षामधील राज्य: भांडवलवादी आणि समाजवादी अर्थशास्त्रातील राज्यांची वैशिष्टये आणि बदलते स्वरुप, आणि प्रगत औद्योगिक व विकसनशील समाज.<br>३. प्रतिनिधित्व आणि सहभागाचे राजकारण: राजकीय पक्ष, प्रगत औद्योगिक व विकसनशील समाजांतील दबावगट आणि सामाजिक चळवळी<br>४. जागतिकीकरण: विकसित आणि विकसनशील समाजांकडून मिळणारे प्रतिसाद.<br>५. आंतरराष्ट्रीय संबंधांच्या अभ्यासातील दृष्टिकोन: आदर्शवाद, वास्तववाद, मार्क्सवाद, कार्यात्मक आणि व्यवस्था सिद्धांत.<br>६. आंतरराष्ट्रीय संबंधांतील प्रमुख संकल्पना: राष्ट्रीय हित, सुरक्षा व सत्ता, सत्तेचे संतुलन आणि प्ररोधन, राष्ट्रातीत कर्ते आणि सामूहिक सुरक्षा, जागतिक भांडवलवादी अर्थशास्त्र आणि जागतिकीकरण.<br>७. बदलती आंतरराष्ट्रीय राजकीय सुव्यवस्था:<br>(अ) महासत्तांचा उदय, रणनीती आणि विचारप्रणालीची द्विध्रुवता, शस्त्रास्त्र स्पर्धा आणि शीतयुद्ध आण्विक धोका.<br>(ब) अलिप्तता चळवळ: ध्येये व प्राप्ती.<br>(क) सोव्हिएत युनियनचे कोसळणे; एकध्रुवीयता आणि अमेरिकन वर्चस्व; समकालीन जगातील अलिप्ततेची औचित्य.<br>८. आंतरराष्ट्रीय आर्थिक प्रणालीची उत्क्रांती: ब्रेटनवूड ते जागतिक व्यापार संघटना; समाजवादी अर्थशास्त्र आणि सीएमईए (परस्पर आर्थिक सहायता परिषद); नवीन आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेची तिसऱ्या जगाची मागणी. जागतिकीकरण आणि जागतिक अर्थव्यवस्था<br>९. संयुक्त राष्ट्रे: अपेक्षित भूमिका आणि प्रत्यक्ष नोंद: विशेषिकृत संयुक्त राष्ट्र अभिकरणे — ध्येये व कार्ये; संयुक्त राष्ट्र सुधारणेची गरज.<br>१०. जागतिक राजकारणाचे प्रादेशिकीकरण: ईयु, एएसईएएन, एपीईसी, एएआरसी, एनएएफटीए.<br>११. समकालीन जागतिक चिंताविषय: लोकशाही, मानवी हक्क, पर्यावरण, लिंगभेद न्याय दहशतवाद, आण्विक वृद्धी. |
| २ | **<u>भारत आणि जग</u>**<br>१. भारतीय परराष्ट्र धोरण: परराष्ट्र धोरण निर्धारक; धोरण निश्चितीच्या संस्था, सातत्य व बदल.<br>२. विविध टप्प्यांवरील असंलग्नता चळवळीतील भारताचे योगदान; सध्याची भूमिका.<br>३. भारत आणि दक्षिण आशिया :<br>(अ) प्रादेशिक सहकार: सार्क — मागील कामगिरी आणि पुढील भवितव्य.<br>(ब) मुक्त व्यापार क्षेत्र म्हणून दक्षिण आशिया.<br>(क) भारताचे “लुक इस्ट” धोरण<br>(ड) प्रादेशिक सहकारातील अडथळे: नदीच्या पाण्याचे विवाद; अनधिकृत सीमा स्थलांतर; मानववंशीय संघर्ष आणि उठाव; सीमा वाद.<br>४. भारत आणि दक्षिण विश्व: अफ्रिका आणि लॅटीन अमेरिका यांच्याशी संबंध; एनआयइओची मागणी व जागतिक व्यापार संघटनेतील वाटाघाटीतील नेतृत्वाची भूमिका.<br>५. भारत आणि सत्तेची जागतिक केंद्रे: युएसए, इयु, जपान, चीन आणि रशिया.<br>६. भारत आणि संयुक्त राष्ट्र प्रणाली, संयुक्त राष्ट्रांच्या शांतता प्रस्थापनेच्या प्रयत्नातील भारताची भूमिका, सुरक्षा परिषदेमध्ये कायम जागेची मागणी.<br>७. भारत व आण्विक प्रश्न: बदलते दृष्टीकोन व धोरण.<br>८. भारताच्या विदेशी धोरणातील अलिकडील विकास: अफगणिस्तान, इराक आणि पश्चिम आशिया यांमधील सध्याच्या अरिष्टावर भारताचे स्थान; युएस आणि इस्त्रायलसोबत वाढते संबंध, नवीन जागतिक व्यवस्थेची दृष्टी. |